## के.ई.एम. रुग्णालयामध्ये महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेद्वारा संचालित रुग्ण समुपदेशन केन्द्र

नोंदणीकृत फार्मासिस्ट हा रुग्ण व डॉक्टर यामधील एक महत्वाचा दुवा आहे. औषधे कशी घ्यावेत, केव्हा घ्यावीत, कशासोबत घ्यावी अथवा घेऊ नये, त्याचे सामान्यतः होणारे दुष्परिणाम याची माहिती रुग्णांना असणे आवश्यक आहे. काही वेळेस सदर माहितीविषयी अनभिज्ञ असल्यास काही medication errors उद्भवू शकतात. उदाहरणादाखल मधुमेहासाठी देण्यात येणा-या Acarbose सारखी गोळी ही जेवणाच्या पहिल्या घासासोबत घेणे गरजेचे आहे. नाहीतर त्या औषधाचा काहीच उपयोग होणार नाही. त्याचप्रमाणे insulin घेतल्यानंतर किमान पंधरा मिनीटांच्या अवधीत जेवणे गरजेचे आहे. याने Hypoglycemia टाळला जातो.

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेने काळाची गरज ओळखून महाराष्ट्रातील कानाकोप-यात जाऊन नोंदणीकृत फार्मासिस्टकरीता विविध शैक्षणिक उपक्रम राबविले आहेत. रुग्ण व त्याच्या नातेवाईकांना औषधांविषयी समुपदेशन करण्याचे प्रशिक्षण नोंदणीकृत फार्मासिस्टना रुग्ण समुपदेशन पाठ्यक्रमाद्वारे दिले जाते. संपूर्ण महाराष्ट्रात आतापर्यन्त नोंदणीकृत फार्मासिस्टना ३७ रुग्ण समुपदेशन पाठ्याक्रम आयोजित करण्यात आले आहेत व त्यास नोंदणीकृत फार्मासिस्टकडून भरभरुन प्रतिसाद मिळाला आहे.

के.ई.एम.रुग्णालयामध्ये समाजातील सर्व स्तरातील रुग्ण आरोग्य सेवा घेण्याकरीता येत असतात. या रुग्णांना औषधांविषयी योग्य माहिती मिळावी या सामाजिक जाणीवेने परिषदेने उचललेले पाऊल म्हणजे रुग्ण समुपदेशन केन्द्र. महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद व के.ई.एम.रुग्णालय (फार्मसी विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील महानगरपालिका रुग्णालयातील पहिले रुग्ण समुपदेशन केन्द्र (Patient Counselling Centre) के.ई.एम.रुग्णालय येथ दिनांक २० जानेवारी,२०१६ पासून सुरु झाले आहे. या रुग्ण समुपदेशन केन्द्राचे उद्घाटन श्री. संजय देशमुख,अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व डॉ.(श्रीमती) सुहासिनी नागदा,संचालिका,वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालय, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या समारंभास मुख्य अतिथी आमदार श्री. जगन्नाथजी शिंदे,सदस्य- विधानपरिषद, कार्यकारिणी सदस्य-महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद,सदस्य-फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया,अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन व डॉ.अविनाश सुपे,अधिष्ठाता, जी.एस.मेडिकल कॉलेज व के.ई.एम. रुग्णालय हे उपस्थित होते.

हे रुग्ण समुपदेशन केन्द्र के.ई.एम.रुग्णालयामध्ये सुरु करण्यासाठी श्री. संजय देशमुख,अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे मोलाचे सहाय्य लाभले. डॉ.सुरेश सरवडेकर,चेअरमन,आय.पी.ए.,एम.एस.बी.-एस.पी.डी. यांनी याकामी पुढाकार घेऊन समन्वयक म्हणून काम पाहिले व परिषदेस योग्य ते मार्गदर्शन व सहकार्य केले. डॉ.अविनाश सुपे, अधिष्ठाता, के.ई.एम.रुग्णालय यांनी व के.ई.एम.रुग्णालयातील फार्मसी विभागातील सौ.माधुरी डोईफोडे, सुप्रिटेन्डंट ऑफ फार्मसी, श्री.शीतल चंदन, फार्मासिस्ट व इतर फार्मासिस्टनी देखील याकामी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. परिषदेच्या निबंधकांनी सर्व प्रशासकीय बाबी त्यांच्या स्तरावर सांभाळून हे केन्द्र उभारणीसाठी विशेष प्रयत्न केले. यासाठी परिषदेचे अध्यक्ष,उपाध्यक्ष,सर्व सदस्य यांचा पाठिंबा व प्रोत्साहन लाभले.

के.ई.एम.रुग्णालयाने परिषदेच्या या रुग्ण समुपदेशन केन्द्रासाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे. या केन्द्र उभारणीसाठी आवश्यक बाबी म्हणजेच पायाभूत सुविधा, प्रशिक्षित व्यक्ती व औषधांच्या माहितीच्या डेटाबेसचे सॉफ्टवेअर,संगणक, माहिती पत्रके इ.महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून पुरविल्या जाणार आहेत. या केन्द्रामध्ये परिषदेतर्फे एक प्रशिक्षित व्यक्ती (नोंदणीकृत फार्मासिस्ट)असेल जी तेथे येणा-या रुग्णांना औषधांविषयी समुपदेशन करेल. सुरवातीला या केन्द्राकडून मेंदूविकार व मधुमेह या विकारांसाठी दिलेल्या औषधाविषयी समुपदेशन करण्यात येईल. कालातंराने इतर प्रकाराच्या विकारांवर समुपदेशन करण्यात येईल.